# सत्ताधारी-विरोधकांनी मांडले 'व्हिजन' महाराष्ट्राचे




> जे. डब्ल्यू मेरिएट, पुणे : 'सकाळ माध्यम समूहा'तर्फे शनिवारी 'ब्रँड्स ऑफ महाराष्ट्र'च्या माध्यमातून राज्यातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवर, संस्था आणि ब्रँड्सचा उपमुख्यमंत्री अजित पवार, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

## उद्योगांत महाराष्ट्र देशात आघाडीवर



" वस्तू व सेवा करामुळे राज्याचे उत्पन्न दरवर्षी १२ ते १३ टक्क्यांनी वाढत आहे. २०१५-१६ मध्ये राज्याचे स्थूल उत्पन्न २० लाख कोटींचे होते. तेव्हा राज्यावर साडेतीन लाख कोटींचे कर्ज होते. ते एकूण उत्पन्नाच्या १७ टक्के होते. २०२३-२४ मध्ये स्थूल उत्पन्न ४१ लाख कोटींचे असून, सात ते साडेसात लाख कोटींचे कर्ज आहे. ते प्रमाणही १७ टक्के आहे.

**- अजित पवार,**
उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री

- विरोधकांकडून सातत्याने नॅरेटिव्ह सेट करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे मराठी माणूस गोंधळात पडला आहे.
- वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपये असलेल्या रोजंदारीवरील, शेतकरी, धुणीभांडी करणाऱ्या महिलांसाठी लाडकी बहीण योजना लागू केली
- स्थूल उत्पनाच्या २५ टक्क्यांपर्यंत कर्ज काढण्यास राज्य सरकारला केंद्र सरकारकडून मान्यता आहे. मात्र त्यापेक्षा अधिक कर्ज काढायचे झाल्यास केंद्राची मान्यता घ्यावी लागते.
- आम्ही सरकार चालवतो, आम्हालाही कळते. केंद्राने घालून दिलेल्या मर्यादेतच आम्ही कर्ज काढले आहे. तेही बाजारातील दराच्या तुलनेत सहा ते सात टक्के व्याज दराने.
- उद्योगांत महाराष्ट्र देशात आघाडीवर असून, अनेकांना रोजगार उपलब्ध झाले आहेत.
- रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे. उत्तम आरोग्य, शिक्षण पुरवण्यासह एक लाखापेक्षा जास्त नोकऱ्या महाराष्ट्रात आम्ही दिल्या आहेत.

## सर्वांना बरोबर घेऊन विकास हवा



" महाराष्ट्राला पुढे न्यायचे असेल, तर सर्वांना बरोबर घेऊन विकास करायला हवा. त्या दृष्टीने नियोजन करणे गरजेचे आहे. मनुष्याला केंद्रस्थानी मानून, महिलांची आर्थिक परिस्थिती उंचावली पाहिजे. तसेच पुणे शहराची ओळख आता माहिती तंत्रज्ञानाचे शहर म्हणून झालेली दिसून येते. परंतु कोयता गँग व सैराट स्वरूपाची जी कार्यपद्धती वाढत आहे. त्यामुळे या क्षेत्राला असुरक्षितता वाटते. या गोष्टीवर आता पोलिसांनी लक्ष ठेवणे गरजेचे आहे.

**- डॉ. नीलम गोऱ्हे,**
उपसभापती, विधान परिषद

- मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेकडे महिलांना सक्षम करण्याचे एक साधन म्हणून पाहिले पाहिजे.
- राजकीय आरक्षणामुळे महिला आता निर्णय घेऊ लागलेल्या आहे. यामुळे दोन्ही सभागृहातील भाषा बदललेली दिसून येते.
- महाराष्ट्राच्या सक्षमीकरणासाठी कृषी क्षेत्रासाठी मोठा निधी मिळाला पाहिजे. सुरक्षित पर्यटन केंद्रे उभारली गेली पाहिजेत.
- केंद्र सरकारने कालबाह्य कायदे बंद करून नवीन कायदे केले आहेत. महिलांना संपत्तीत वाटा मिळणे हा कायदा आहे. मात्र जेव्हा अधिकार डावलला जातो, त्याचवेळी महिला पेटून उठतात.
- मार्केटिंगचा मुद्दा ठेवून अशा मालिका बनवल्या जात आहेत. महिलांवरील हिंसेचे चित्रीकरण केले जाते, ते योग्य नाही.
- तरुणींनी आपण कसे बोलतोय, आपल्याला काय बोलायचे ते कमी शब्दांत बोलले पाहिजे. तसेच सुंदर दिसण्यासाठी जास्त हव्यास नको आहे.

## पुरंदर विमानतळ मार्गी लागणार



" पुण्यासाठी सध्या असलेले विमानतळ सुरूच राहणार आहे. पुरंदर विमानतळ अल्पावधीत मार्गी लागणार आहे. त्यासाठीची प्रशासकीय प्रक्रिया यापूर्वीच सुरू झाली आहे. राज्य सरकारमार्फत त्याचा पाठपुरावा सुरू आहे. तसेच नवी मुंबई विमानतळाचे काम शेवटच्या टप्प्यात असून तेही लवकरच सुरू होईल.

**- मुरलीधर मोहळ,**
केंद्रीय सहकार आणि नागरी उड्डाण राज्यमंत्री

- पहिल्यांदा महाराष्ट्राला प्राधान्य देण्याचा प्रयत्न असेल. माझ्याकडे जी खाती आहेत, त्यात महाराष्ट्रासाठी काय करता येईल, यासाठी प्रयत्न करणार आहे.
- राज्यांतर्गत विमानाच्या प्रवासाठी 'उडाण' नावाची योजना आणली आहे. महाराष्ट्रातील सध्याची काय परिस्थितीत आहे, याची माहिती मागविली आहे.
- गाव पातळीवरच्या सहकारी संस्था मजबूत करण्यासाठी सरकार नवीन योजना आणत आहोत. पुढील पाच वर्षांत दोन लाख नवीन सहकारी संस्था सुरू करण्यात करण्यात येणार आहेत.
- महाराष्ट्रात ५० टक्क्यांपेक्षा जास्त माणसे सहकाराशी जोडली आहेत. देश म्हणून विचार होतो, त्या वेळी महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक पहिल्यांदा चर्चेला येते.
- लवकरच सहकाराचे विश्व विद्यालय सुरू करण्यात येणार आहे. याची घोषणा अमित शहा यांनी केलेली आहे.
- ग्रामीण भागातील महिलासुद्धा आता सहकाराशी जोडल्या जात आहेत. त्या ऑनलाइन सेवा शिकून घेत आहेत.

## प्रत्येक महिन्यात अधिवेशन व्हायला हवे



" विधिमंडळाची वर्षभरात तीन अधिवेशने होतात, त्यातील बराच काळ गोंधळात जातो. नव्या आमदारांना बोलण्याची संधीही कमी मिळते. घाईघाईत निर्णय होतात. त्यामुळे लोकप्रतिनिधींनी सभागृहात गांभीर्याने वागले पाहिजे. राज्याच्या विकासावर चर्चा झाली पाहिजे, त्यावर मंत्र्यांना उत्तर देता आले पाहिजे. यासाठी प्रत्येक महिन्यात किमान चार दिवस तरी अधिवेशन झाले पाहिजे.

**- चंद्रकांत पाटील,**
संसदीय कार्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री

- २०१४ पूर्वी ज्यांना आरक्षण होते, त्यांनाच शैक्षणिक सुविधा होत्या. पण मुख्यमंत्री झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी आरक्षण आणि सुविधा या दोन्ही गोष्टी वेगळ्या केल्या.
- २०१७ पासून पारंपरिक उच्चशिक्षणाचे शुल्क माफ केले, तर व्यावसायिक शिक्षणाचे शुल्क ५० टक्के माफ केले आहे.
- सहकारी क्षेत्रात संस्था जिवंत राहण्यासाठी आम्ही प्रयत्न केले आहेत. अनेक संस्थांना निधीच्या मदत केली.
- वीजबिलात प्रतियुनिट ३ रुपये माफ केले. दोन हजार कोटींचे कर्ज बिनव्याजी दिले आहे.
- महाराष्ट्रात ७०-८० टक्के कापसावर प्रक्रिया झाल्यास यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल.
- बीए, बीकॉम, बीएससी या पारंपरिक अभ्यासक्रमांमध्येदेखील कौशल्य विकासासाठी अभ्यासक्रम तयार केला जाणार आहे. कौशल्य हे भविष्य असणार आहे.

## सापत्न वागणूक महाराष्ट्रालाच का?



" देशातील इतर राज्यांत गुंतवणूक जात असेल, तर आपल्याकडे का येत नाही? मुंबई फायनान्शिअल कॅपिटल करण्यासाठी प्रयत्न करू, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. पण गुजरातेत काढलेल्या फायनान्शिअल हबला प्रतिसाद मिळत नसल्याने त्यांनी कर सवलतीची सूट दिली आहे. गुजरातप्रमाणे महाराष्ट्राला समान न्याय का नाही?

**- खा. सुप्रिया सुळे,** कार्याध्यक्षा,
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष

- लोकांना एक खिडकी योजना पाहिजे. कोणत्याही उद्योग-व्यावसायांना त्रास लोकांना नको आहे. ३० दिवसांच्या मुदतीत परवानगी देण्याची व्यवस्था हवी.
- महाराष्ट्र इंडस्ट्री फ्रेंडली स्टेट असूनही सोई-सुविधा दिल्या जात नाही. अधिकची ऊर्जा निर्माण होत असूनही आज वीज जाते.
- जल व वायू प्रदूषणाच्या समस्येकडे गांभीर्याने बघावे लागेल. यामुळे मानवी आरोग्य, शेतीवर दुष्परिणाम होणार आहे.
- महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी दीर्घकालीन, मध्यम व अल्प काळासाठीच्या उपाययोजना केल्या पाहिजेत.
- प्रशासकीय व्यवस्थेत असलेला अद्ययावत तंत्रज्ञानाचा अभाव पहिल्यांदा दूर करावा लागले.
- ऑक्टोबरमध्ये आमचे सरकार आल्यानंतर पहिल्यांदा प्रत्येक सरकारी जागांवरील रिक्त पदे शंभर टक्के भरली जातील.
- न खाऊंगा, न खाने दुंगा म्हणून उपयोग नाही, तर ते प्रत्यक्ष कृतीत उतरवून दाखविले पाहिजे.

## प्रत्यक्ष कामापेक्षा घोषणांवरच भर



" लघु आणि मध्यम उद्योग हा रोजगारनिर्मितीचा कणा आहे. त्याला बूस्टर मिळेल, असे कोणतेही धोरण सरकारचे दिसत नाही. त्यामुळेच बेरोजगारीचे प्रमाण सात टक्क्यांवरून ११ टक्क्यांपर्यंत पोहचले आहे. आपले अपयश झाकण्यासाठी लोकप्रिय घोषणा करून करदात्यांच्या पैशांची उधळपट्टी सुरू आहे. करदाते चिंतेत असायला पाहिजेत, पण ते चित्र दिसत नाही.

**-जयंत पाटील,** प्रदेशाध्यक्ष,
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष

- राज्यावर आज १ लाख १४ हजार कोटींचे कर्ज आहे. सरकार घोषणा करते, परंतु खर्च करू शकत नाही. तेवढे पैसे नाहीत.
- महाराष्ट्रातील रोजगाराची स्थिती वाईट आहे. लघु व मध्यम उद्योगांकडे लक्ष नाही. मोठे प्रकल्प येत नाहीत.
- राज्यात नवीन गुंतवणूक होत नाही. महाराष्ट्रातून आतापर्यंत १७ उद्योग गुजरातमध्ये गेले. आपले राज्यकर्ते त्याविरोधात बोलू शकत नाहीत.
- जीएसटीद्वारे शेतकऱ्यांकडून १८ हजार रुपये वसूल केले जातात आणि १२ हजार दिले जात आहेत.
- अपयश लपविण्याचा हा प्रयत्न आहे. नाराज घटकांना कसे आनंदी करता येईल, ते पाहणे चालू आहे. करदात्यांचा पैसा अशा पद्धतीने खर्च करणे चुकीचे आहे.
- मध्यमवर्गीयांच्या खिशातून कमीत कमी पैसे घेऊन विकास होण्याची गरज आहे. आरोग्य आणि शिक्षणावर अधिक काम व्हायला हवे.




> 'सकाळ माध्यम समूहा'तर्फे शनिवारी 'ब्रँड्स ऑफ महाराष्ट्र'च्या माध्यमातून राज्यातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ब्रँड्सचा केंद्रीय सहकार आणि नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ व खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.